पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५१**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १७/२/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २२२९**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जानेवारी २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/६७६२ दि.१०/२/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २२३०**

मा.सौ.रुपाली धाडवे यांचे दि.१०/२/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील विविध वस्त्यांमध्ये नवीन बांधकामास नव्याने टॅक्स लावण्यात आलेला आहे तरी काही नागरिकांची एक रकमी भरावयाची परिस्थिती नसल्या कारणाने पुणे महानगरपालिके मार्फत जी मागच्या वर्षात अभय योजना राबविली होती तीच याही वर्षी ही अभय योजना लागु करावी जेणे करून नागरिकांना लाभ होईल व पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकावर भर पडेल.

**विषय क्र. २२३१**

मा.सौ.निलिमा खाडे यांचे दि. १२/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. १४ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. CE28A16/SJ16-235, प्रभाग क्र. १४ ब , मधील माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक पुतळ्यास मेघडंबरी बसविणे. | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र. १४ ब , मध्ये डेक्कन परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १४ ब , मध्ये पुलाची वाडी व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रिटीकरण, फरशी बसविणे | --- | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २२३२**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१५ जानेवारी २०२० ते दि.३१ जानेवारी २०२० ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.–१/१०६३ दि.७/२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २२३३**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/१/२०२० ते दि.३१/१/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.–४/१०८६ दि.११/२/२०२० चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २२३४**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१८–१९ या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/२१५६ दि. ११/२/२०२० ने पाठविलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. २२३५**

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**